# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:21.06.2025** **वार:शनिवार**

---

1. 11व्या आंतरराष्ट्रीय योगदिनाचा सर्वत्र उत्साह; देशासह जगभरात योग प्रात्यक्षिकांचं आयोजन
2. संत श्री ज्ञानेश्वर महाराज आणि संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचं पुण्यनगरीत उत्साहात स्वागत
3. कृषी उत्पादनाच्या प्रक्रियेतले मध्यस्थ दूर करून नाफेड शेतकऱ्यांकडून खरेदी करणार असल्याची केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांची घोषणा
4. धरती आबा अभियानाअंतर्गत आदिवासी गावांचा कायापालट करणा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि
5. इंग्लंडविरुद्ध पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताची दमदार सुरुवात; यशस्वी जयस्वाल आणि शुभमन गिलचे शतक

**<u>योगदिन</u>**

11व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा आज सर्वत्र उत्साह आहे. 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' अशी यंदाच्या योग दिनाची संकल्पना असून यानिमित्ताने जगभरात विविध ठिकाणी योग प्रात्यक्षिकांचं आयोजन करण्यात आलं आहे. आयुष मंत्रालयानं विशाखापट्टणम इथं योग दिनाच्या मुख्य कार्यक्रमाचं आयोजन केलं असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत थोड्याच वेळात कार्यक्रमाला सुरुवात होत आहे. 5 लाख योगसाधक आजच्या कार्यक्रमात सहभागी होत आहेत.

सांस्कृतिक मंत्रालयानं देशभरातील 100 पर्यटन स्थळांवर आणि 50 सांस्कृतिक स्थळांवर योग प्रात्यक्षिकांचं आयोजन केलं आहे. सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत राजस्थानमधील जोधपूर इथल्या ऐतिहासिक मेहरानगड किल्ल्यावर योग कार्यक्रमात सहभागी होतील.

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांचा समावेश असलेल्या आसाममधील चराईदेव मैदाम, गुजरातमधील राणी की वाव आणि धोलावीरा, कर्नाटकमधील हंपी आणि पट्टडकल, मध्यप्रदेशातील खजुराहो स्मारके आणि सांची स्तूप, ओडिशातील कोणार्क येथील सूर्य मंदिर, महाराष्ट्रातील वेरूळ लेणी आणि तामिळनाडूमधील तंजावर येथील बृहदीश्वर मंदिर आदि ठिकाणी योग दिन साजरा करण्यात येत आहे. आजच्या विशाल योगसंगम कार्यक्रमासाठी देश- परदेशातून नोंदणी केलेल्या योग अभ्यासकांची संख्या 10 लाखांच्या पुढे गेली आहे.

**<u>योगदिन</u>**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज पुण्यात केंद्र आणि राज्य सरकारची विविध कार्यालयं आणि खासगी संस्था, संघटना योग प्रात्यक्षिकं सादर करणार आहेत. केंद्रीय संचार ब्युरोच्यावतीनं यानिमित्तानं आजपासून तीन दिवस बहुमाध्यम चित्र प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या पुण्यात दाखल झाल्या असून आजच्या योग दिनी राज्य सरकारच्या पुढाकाराने ‘वारकरी भक्तीयोग उपक्रम’ आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या उपक्रमात वारकरी, विद्यार्थी, योग अभ्यासक एकत्रितपणे योगसाधना करणार आहेत. योगदिनानिमित्त पुण्यातील योग शिक्षिका रूपाली नारखेडे यांनी चक्रासनाबद्दल माहिती दिली. त्या म्हणाल्या.....

**आसन करताना सर्वात आधी पाठीवर झोपावे, दोन्ही पाय गुडघ्यातून फोल्ड करावे पायात कंबरे इतकं अंतर घ्यायचे दोन्ही हात कानांच्या बाजूला उलट्या दिशेने ठेवावे हातांवर आणि पायांवर जोर देऊन श्वास घेत पूर्ण शरीर वरच्या बाजूला उचलायचे साधारण श्वसन करत तीस सेकंद किंवा आपल्या सोयीनुसार आसन टिकवून ठेवावे श्वास सोडताना पुन्हा खाली येऊन पूर्वस्थितीत यावे चक्रासन केल्याने तुमची श्वसनक्रिया उत्तम होते पाठीचा कणा बळकट होतो व त्याची लवचिकता वाढते तसेच खांदे हात पाय आणि पोटाचे स्नायू मजबूत होतात ज्या लोकांच्या मणक्यात गॅप असेल त्यांनी हे आसन करू नये.**

योग केवळ शारीरिक व्यायाम नसून, आपल्या मन आणि आत्म्याला शांती प्रदान करणारी एक जीवनशैली आहे. ऐकुयात एक संदेश....

**कुछ लोग सोचते हैं योग के लिए फ्लेक्सिबिलिटी चाहिए लेकिन फ्लेक्सिबिलिटी तो सोच में होनी चाहिए ना, ना कोई बंधन,ना कोई बॉडी टाइप बचपन हो या पचपन, व्हील चेअर हो या वर्क फ्रॉम होम, योग सबका हक है... योग जीवन से जब जुडता है, एक सहज क्रिया बन जाता है, तो वो प्रतिफल उसका बेनिफिट देता रहता है... आइये इस इक्कीस जून हम सब हिस्सा बने अंतरराष्ट्रीय योग दिवस का और करे स्ट्रेच एंड चिल योग के साथ...**

**<u>वारी</u>**

ऊन पावसाच्या खेळात आणि भक्तीरसाच्या वातावरणात संत श्री ज्ञानेश्वर महाराज आणि संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचं काल पुण्यनगरीत आगमन झालं. ऐकूयात याविषयी अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून.....

**यंदा राज्यात झालेल्या सर्वदूर पावसाने सुखावलेले वारकरी खांद्यावर भगवी पताका घेऊन ज्ञानोबा आणि तुकोबांच्या पालख्यांसोबत काल पुण्यात आले. तुकोबांची पालखी जुन्या मुंबई पुणे रस्त्यामार्गे वाकडेवाडी इथला विसावा घेऊन पाटील इस्टेटमार्गे पुण्यात आली, तर ज्ञानोबांची पालखी संगमवाडी येथे संध्याकाळचा विसावा घेऊन पाटील इस्टेटमार्गे पुण्यात आली, याठिकाणी स्थानिकांनी पुष्पवृष्टी करून दोन्ही पालख्यांचे जोरदार स्वागत केलं. शहरात रांगोळ्या काढून पुणेकरांनी पालख्यांचं स्वागत केलं. राजकीय पक्ष आणि सामाजिक संस्थांनी वारकऱ्यांच्या सेवार्थ अन्नदान आणि इतर उपक्रम राबवून आपली सेवा अर्पण केली. पुणेकर नागरिकही आळंदी आणि आकुर्डी ते पुण्यापर्यंत पायी या वारीत सहभागी झाले होते. रात्रीं उशीरा दोन्ही पालख्या आपल्या दोन दिवसांच्या मुक्कामाच्या ठिकाणी विसावल्या. आगमनानंतर आज पूर्ण दिवस तुकोबांच्या पालखीचा मुक्काम नाना पेठेतील निवडुंगा विठ्ठल मंदिरात आणि माऊलींच्या पालखीचा मुक्काम भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात असेल. आकाशवाणी बातम्यांसाठी संतोष गोगले पुणे.**

यंदा रत्नागिरीतून प्रथमच पंढरपूरला सायकलवारी निघाली आहे. शहरातील श्री विठ्ठल मंदिरातून रत्नागिरी सायकलिस्ट क्लबचे नऊ सायकलपटू पंढरपूर वारीसाठी रवाना झाले. तर नाशिक इथल्या सायक्लिस्ट फाऊंडेशनच्यावतीनं पर्यावरण संवर्धन सायकल वारीचे आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>शहा कृषी</u>**

कृषी उत्पादनाच्या प्रक्रियेतले मध्यस्थ दूर करून नाफेड लवकरच शेतकऱ्यांकडून खरेदी करायला सुरुवात करणार असल्याची घोषणा केंद्रीय गृह आणि सहकारिता मंत्री अमित शहा यांनी केली आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने आयोजित राष्ट्रीय परिसंवादात ते काल मुंबईत बोलत होते. यामुळे शेतकऱ्यांना उत्पादनाची योग्य किंमत मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सहकार सूत्रावर आधारित विमा कंपनीही सरकार लवकरच सुरू करणार असल्याचं ते म्हणाले. देशभरात दोन लाख नव्या प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था स्थापन करणार असल्याची माहितीही शहा यांनी यावेळी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना महाराष्ट्राला लाभलेला 120 वर्षांचा सहकार चळवळीचा इतिहास अधोरेखित केला. देशाची

अन्नसुरक्षा अबाधित राखणं, शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवणं, देशवासीयांना पोषणयुक्त आहार देणं आणि पृथ्वीचं हित जपणं ही सरकारसमोरची प्रमुख उद्दिष्टं असल्याचं केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी परिषदेत सांगितलं.

**धरतीआबा**

'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान' अंतर्गत राज्यातील आदिवासी गावांमध्ये 17 प्रकारच्या योजनांची अंमलबजावणी करून आदिवासी समाजाचा कायापालट केला जाणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.जळगाव जिल्ह्यातल्या धरणगाव इथं उभारण्यात आलेल्या क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मारकाचे उद्घाटन तसंच जामनेर तालुक्यातील गोद्री फत्तेपूर येथे गोर बंजारा आणि लबाना कुंभ स्मृतीस्थळी पाच कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन दूरस्थ पद्धतीने फडणवीस यांच्या हस्ते काल करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. भविष्यात इथं महिलांसाठी कौशल्य विकास आणि फळप्रक्रिया प्रशिक्षण केंद्र उभारले जाईल असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**रुग्णालय**

धरणगाव येथील ग्रामीण रुग्णालयाचं श्रेणीवर्धन करून 50 खाटांचे अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालय उभारले जाणार आहे. या रुग्णालयाची मुख्य इमारत आणि वैद्यकीय अधिकारी निवासस्थानाचं भूमिपूजनही फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं.

**क्रिकेट**

इंग्लंडमधील हेडींग्ले इथं सुरू असलेल्या भारत आणि इंग्लंड यांच्यातील तेंडुलकर-अँडरसन चषकातील पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात काल पहिल्या दिवशी भारताच्या 3 बाद 359 धावा झाल्या आहेत. तत्पूर्वी इंग्लंडने नाणेफेक जिंकून कक्षेत्ररक्षण करण्याचं निर्णय घेतला. के एल राहुल 42 धावांवर तर कसोटी पदार्पण करणारा साई सुदर्शन शून्यावर बाद झाला. सलामीवीर यशस्वी जयस्वाल 101 धावा केल्या तर कर्णधार शुभमन गिल 127 आणि उपकर्णधार ऋषभ पंत 65 धावांवर खेळत आहेत.

**पाऊस**

नाशिक शहर आणि परिसरात दोन दिवस जोरदार पाऊस झाल्याने काल गंगापूर धरणातून विसर्ग वाढवण्यात आला आहे. वालदेवीत एक जण बुडाल्याची घटना घडली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील धनगरवाडी लघु प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला असून प्रकल्पामधून विसर्ग सुरू करण्यात आला आहे. तर हिरण्यकेशी नदी पात्रातील पाणी पातळी वाढ होण्याची शक्यता असल्यामुळे नदी काठच्या ग्रामस्थांनी सतर्क राहण्याचं आवाहन प्रशासनाने केलं आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकणात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.